माझी लाडकी बहिण योजनेची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ३० दिवसाची मुदतवाढ द्या

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केलेल्या आग्रही मागणीला सकारात्मक प्रतिसाद

आ.मुनगंटीवार यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांना दिले पत्र

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महिला व बालविकास विभागाचे सचिव यांच्यासोबत दूरध्वनीवरून आ. मुनगंटीवार यांनी केली चर्चा

चंद्रपूर : महाराष्ट्रातील कोट्यवधी बहिणींना आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षिततेचा आधार ठरलेली ‘माझी लाडकी बहिण’ योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असलेली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर २०२५ आहे. मात्र विविध तांत्रिक अडचणींमुळे मोठ्या प्रमाणावर लाभार्थींना ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करता येत नसल्याने ई-केवायसीसाठी किमान ३० दिवसांची मुदतवाढ देणे अत्यावश्यक असल्याची मागणी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.या संदर्भात आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली असून, या चर्चेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तसेच महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांना पत्राद्वारे तातडीने निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर लाभार्थी बहिणी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करत असताना मोबाईलवर आधार ओटीपी येण्यात सातत्याने होणारा विलंब, ग्रामीण भागातील इंटरनेट समस्या, सेवा केंद्रांवरील वाढती गर्दी आणि तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी वारंवार अयशस्वी होत असल्यामुळे हजारो महिलांची ई-केवायसी प्रक्रिया अद्याप प्रलंबित

आहे.ई-केवायसी वेळेत पूर्ण न झाल्यास ‘माझी लाडकी बहिण’ योजनेचा लाभ थांबेल का, या भीतीने लाभार्थी महिलांमध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिस्थितीची माहिती मिळताच आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले की,माझी लाडकी बहिण’ ही योजना म्हणजे राज्यातील कोट्यवधी बहिणींसाठी केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या जीवनातील स्थैर्य, आत्मविश्वास आणि सुरक्षेची हमी आहे. तांत्रिक कारणांमुळे एकही पात्र महिला लाभापासून वंचित राहू नये. यासाठी ई-केवायसी प्रक्रियेस किमान ३० दिवसांची मुदतवाढ देणे अत्यंत आवश्यक आहे.लाखो महिलांचे हक्काचे आर्थिक सहाय्य थांबू नये, हा मुख्य उद्देश असून ई-केवायसीसाठीची अंतिम मुदत ३० दिवसांनी वाढविण्याचा निर्णय तातडीने घेण्यात यावा,अशी आग्रही मागणी आमदार मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री , महिला व बालकल्याण मंत्री आणि महिला व बालविकास विभागाचे सचिव यांच्याकडे केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार हे नेहमी जनतेच्या समस्या समजून घेत त्यावर तात्काळ उपाययोजना करणारे संवेदनशील नेते म्हणून ओळखले जातात. कोणत्याही योजनेचा उद्देश पूर्ण व्हावा आणि पात्र लाभार्थ्यांना वेळेत मदत मिळावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. ‘माझी लाडकी बहिण’ योजनेतील महिलांना तांत्रिक समस्यांचा सामना करावा लागत असल्याची माहिती मिळताच त्यांनी कोणताही विलंब न करता थेट मुख्यमंत्री, मंत्री आणि विभागाचे सचिव यांच्याशी पत्र लिहून दूरध्वनीद्वारे संवाद साधला आणि लाखो महिलांना लाभाचा प्रवाह खंडित होऊ नये म्हणून ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देण्याची ठाम भूमिका मांडली. जनतेच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने प्रतिसाद देऊन प्रभावीपणे पाठपुरावा करणे ही त्यांची कार्यशैली असून, हिच बाब यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे, हे विशेष.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 8761 /नोव्हेंबर/२०२५ दिनांक : १७/११/२०२५

प्रति,

**मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस**
**मुख्यमंत्री,**
**महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२**

**वंदे मातरम् !**

**विषय:** माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत EKYC पूर्ण करण्यासाठी अंतिम तारखेची मुदत ३० दिवसांनी वाढविणेबाबत.

**महोदय,**

माझी लाडकी बहीण" ही योजना म्हणजे महाराष्ट्रातील कोट्यावधी भगीनींकरीता एक आधार व सुरक्षीत भवीष्याची हमी असल्याची भावना आहे. महायुती शासनाने अगदी एक कुटुंबप्रमुखाप्रमाणे आपल्या भगीनींना दिलेल्या प्रेमळ वचनाचे पालन करण्यासाठी आपण सगळे वचनबध्द आहोत. ही योजना तळागाळापर्यंतच्या भगीनींसाठी केवळ आर्थिक मदत नाही तर ती असंख्य कुटुंबांच्या घरी पालनपोषणाची शक्ती आहे. शेकडो विधवा, घटस्फोटीत, एकल महीला तसेच आर्थिक दृष्टया अशक्त अश्या महीलांसाठी ही योजना म्हणजे प्रत्येक महिन्याला मिळणारे समाधान व आत्मविश्वास आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी "माझी लाडकी बहीण" योजनेअंतर्गत लाभार्थी भगीनींना EKYC पूर्ण करण्यासाठी अंतिम तारीख १८ नोव्हेंबर २०२५ देण्यात आली असून राज्यभरातून अनेक भगीनी विविध कारणांनी निर्धारीत वेळेस EKYC पूर्ण करु शकल्या नाही. अनेक तांत्रीक समस्या जसे आधार OTP समस्या, इंटरनेट अडचणी, सेवा केंद्रावरील प्रचंड गर्दी इत्यादीमुळे EKYC करण्यात अनेक लाभार्थ्यांना अडचण गेली. त्यामुळे आपल्या भगीनी EKYC जर वेळेत झाली नाही तर माझा हक्काचा लाभ बंद होईल का ? यामुळे भयभीत आहेत.

आपल्या महायुती सरकारमध्ये महीलांच्या सन्मानासाठी, सुरक्षेसाठी व प्रगतीसाठी केलेले कार्य सर्व स्तरावर अत्यंत आदराने पाहीले जाते. या योजनेच्या लाभातून कोणतीही पात्र महीला वंचित राहू नये ही आपल्या शासनाकडून अपेक्षा आहे. लाखो महीलांना या योजनेतून मिळणारा आर्थिक आधार अत्यंत महत्वाचा आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

त्यामुळे लाभार्थी महीलांच्या अडचणी लक्षात घेता या योजनेच्या EKYC ची मुदत ३० दिवसांनी वाढविणे अतिशय गरजेचे आहे.

आपणास विनंती आहे की, याबाबत त्वरीत मुदतवाढीचे आदेश काढून ग्रामिण व शहरी सर्व स्तरावरील महीलांना EKYC प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी ३० दिवसांची मुदतवाढ द्यावी व शासनाचा उद्देश प्रभाविपणे साध्य करण्यास सहकार्य करावे.

कृपया कार्यवाहीबाबत अवगत करावे, ही विनंती.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१) श्री. हरीश शर्मा, जिल्हाध्यक्ष, भाजपा ग्रामिण चंद्रपूर
२) श्री. राहुल पावडे, माजी जिल्हाध्यक्ष, भाजपा, चंद्रपूर शहर
३) श्रीमती संध्याताई गुरनुले मु.पो.ता. मुल जि.चंद्रपूर
४) श्री. चंदु मारगोनवार, तालुकाध्यक्ष भाजपा मुल
५) श्री. प्रविण मोहुर्ले, शहराध्यक्ष भाजपा मुल शहर
६) श्री. पिंटु देऊळकर तालुकाध्यक्ष भाजपा बल्लारपूर
७) श्री. रणंजय सिंह शहराध्यक्ष भाजपा बल्लारपूर शहर
८) श्री. श्रीनिवास जंगम तालुकाध्यक्ष भाजपा चंद्रपूर
९) श्री. हरीश ढवस तालुकाध्यक्ष भाजपा पोंभुर्णा
१०) कु. अल्काताई आत्राम मु.भिमणी ता.पोंभुर्णा जि.चंद्रपूर
११) श्रीमती रेणूकाताई दुधे, मु.पो.ता. बल्लारपूर जि.चंद्रपूर